# RInfra–Transmission (RInfra-T)

Executive Summary (Marathi):

Multi Year Tariff (MYT) Petition for the Control Period: FY 2016-17 to FY 2019-20

Filed with

Maharashtra Electricity Regulatory Commission

## अनुक्रमणिका


**१. प्रस्तावना....................................................४**

१.१ बहुवार्षिक दर (एमवायटी) नियमावली....................................................४

१.२ एमवायटी याचिकेचे उद्दिष्ट....................................................४

**२. आर्थिक वर्ष १४–१५ साठी अचूक समायोजन....................................................४**

२.१ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण....................................................४

२.१.१ वित्तपुरवठा योजना....................................................५

२.१.२ कर्ज भांडवलावर व्याज....................................................६

२.१.३ घसारा....................................................६

२.१.४ समभागांवर परतावा....................................................६

२.२ संचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च....................................................६

२.२.१ एमवायटी नियमावलीनुसार निकष....................................................६

२.२.२ संचालन आणि देखभालीमध्ये कार्यक्षमता प्राप्ती/नुकसान....................................................६

२.२.३ संचालनाशी संबंधित अतिरिक्त खर्च....................................................७

२.३ खेळत्या भांडवलावर व्याज....................................................८

२.४ आपतकालीन साठ्यात योगदान....................................................८

२.५ प्राप्तीकर....................................................८

२.६ आर्थिक वर्ष १४–१५ साठी महसूल....................................................८

२.६.१ इनएसटीएसमधून महसूल....................................................८

२.६.२ बिगरदर उत्पन्न....................................................८

२.६.३ इतर उद्योगांमधून उत्पन्न....................................................९

२.६.४ आरइऩ्फ्रा–टी नेटवर्क उपलब्धतेवर प्रोत्साहन....................................................९

२.७ आर्थिक वर्ष १४–१५ साठी महसुली तफावत/अतिरिक्त ....................................................९

**३. आर्थिक वर्ष १५–१६ साठी तात्पुरते अचूक समायोजन....................................................१०**

३.१ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण....................................................१०

३.१.१ वित्तपुरवठा योजना....................................................११

३.१.२ कर्ज भांडवलावर व्याज....................................................११

३.१.३ घसारा....................................................११

३.१.४ समभागांवर परतावा....................................................१२

३.२ संचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च....................................................१२

३.२.१ एमवायटी नियमावलीनुसार निकष....................................................१२
३.२.२ संचालनाशी संबंधित अतिरिक्त खर्च....................................................१२
३.३ खेळत्या भांडवलावर व्याज....................................................१३
३.४ आपतकालीन साठ्यात योगदान....................................................१३
३.५ प्राप्तीकर....................................................१३
३.६ आर्थिक वर्ष १५-१६ साठी महसूल....................................................१३
३.६.१ इनएसटीएसमधून महसूल....................................................१३
३.६.२ बिगरदर उत्पन्न....................................................१३
३.६.३ इतर उद्योगांमधून उत्पन्न....................................................१४
३.७ आर्थिक वर्ष १५-१६ साठी महसुली तफावत/अतिरिक्त ....................................................१४

**४. आर्थिक वर्ष १६-१७ ते आर्थिक वर्ष १९-२० या कालावधीसाठी एआरआर....................................................१५**

४.१ भांडवली गुंतवणूक योजना....................................................१५
४.१.१ वित्तपुरवठा योजना....................................................१६
४.१.२ कर्ज भांडवलावर व्याज....................................................१६
४.१.३ घसारा....................................................१७
४.१.४ समभागांवर परतावा....................................................१७
४.२ संचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च....................................................१७
४.३ खेळत्या भांडवलावर व्याज....................................................१८
४.४ आपतकालीन साठ्यात योगदान....................................................१८
४.५ प्राप्तीकर....................................................१८
४.६ महसूल....................................................१८
४.६.१ बिगरदर उत्पन्न....................................................१८
४.६.२ इतर उद्योगांमधून उत्पन्न....................................................१९
४.७ आर्थिक वर्ष १४-१५ साठी महसुली तफावतींवर पुढे नेण्याचा खर्च/अतिरिक्त....................................................१९
४.८ एकूण महसुली आवश्यकता....................................................१९

## तक्तयांची यादी

तक्ता १: सारांश- आर्थिक वर्ष १४- १५ साठी भांडवली खर्च आणि भांडवलीकरण....................................................५
तक्ता २: सारांश- आर्थिक वर्ष १४-१५ साठी प्रत्यक्ष संचालन आणि देखभाल खर्च.................................................... ७
तक्ता ३: आर्थिक वर्ष १४-१५ साठी अचूक समायोजन सारांश....................................................१०
तक्ता ४ : सारांश-आर्थिक वर्ष १५-१६ साठी भांडवली खर्च आणि भांडवलीकरण....................................................११
तक्ता ५: सारांश-आर्थिक वर्ष १५-१६ साठी प्रत्यक्ष संचालन आणि देखभाल खर्च....................................................१२

तक्ता ६: आर्थिक वर्ष १५-१६ साठी तात्पुरती तफावत/अतिरिक्त........................................................१४
तक्ता ७: नियंत्रण कालावधीदरम्यान भांडवली खर्च........................................................................१६
तक्ता ८: नियंत्रण कालावधीदरम्यान आयडीसीसह भांडवलीकरण ........................................................१६
तक्ता ९: संचालन आणि देखभाल खर्च.....................................................................................१७
तक्ता १०: नियंत्रण कालावधीसाठी एआरआर...............................................................................२०

## १. प्रस्तावना

### १.१ बहुवार्षिक दर (एमवायटी) नियमावली

माननीय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (यानंतर माननीय आयोग/ माननीय एमईआरसी असे संदर्भित) यांनी विद्युत कायदा २००३ (यानंतर इए,०३ या नावाने संदर्भित) च्या सुसंगत विभागांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खालील नियमावली जारी केली आहे

- ४ फेब्रुवारी २०११ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवार्षिक दरपत्रक) नियमावली २०११ (यानंतर एमवायटी नियमावली २०११ असे संदर्भित) आणि
- ८ डिसेंबर २०१५ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवार्षिक दरपत्रक) नियमावली २०१५ (यानंतर एमवायटी नियमावली २०१५ असे संदर्भित)

एमवायटी नियमावली २०११ ही रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (यानंतर आरइन्फ्रा असे संदर्भित) ला आर्थिक वर्ष १२–१३ पासून (माननीय आयोगाच्या खटला क्रमांक ४५/ २०११ द्वारे) आर्थिक वर्ष १५–१६ पर्यंत लागू आहे. एमवायटी नियमावली २०१५ आर्थिक वर्ष १६–१७ पासून आर्थिक वर्ष १९–२० पर्यंत लागू आहे.

### १.२ एमवायटी याचिकेचे उद्दिष्ट

उपरोल्लिखितनुसार सध्याची बहुवार्षिक दरयाचिका आरइन्फ्रा–टीकडून आर्थिक वर्ष १४–१५ साठी अंतिम अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष १५–१६ साठी तात्पुरते अचूक समायोजन, दोन्ही एमवायटी नियमावली २०११च्या तरतुदींअंतर्गत प्राप्त करण्यासाठी आणि एमवायटी नियमावली २०१५ च्या तरतुदींअंतर्गत एकूण महसुली आवश्यकता (एआरआर) निश्चितीसाठी आर्थिक वर्ष १६–१७ ते आर्थिक वर्ष १९–२० पर्यंत पुढील नियंत्रण कालावधीसाठी दाखल करण्यात आली आहे.

## २. आर्थिक वर्ष १४–१५ साठी अचूक समायोजन

सदर याचिकेत आरइन्फ्रा–टी आर्थिक वर्ष १४–१५ साठी आलेले प्रत्यक्ष खर्च आणि कमावलेला महसूल अचूक समायोजनाच्या उद्दिष्टासाठी दाखल करत आहे.

### २.१ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आरइन्फ्रा–टीला ३७.४२ कोटी रूपयांचा भांडवली खर्च आला असून प्रत्यक्ष भांडवलीकरण ३४.६० कोटी रूपये झाले आहे.

आर्थिक वर्ष १४–१५ साठी भांडवली खर्च आणि भांडवलीकरणाचा सारांश खाली दिल्याप्रमाणे आहे.

**तक्ता १: सारांश– आर्थिक वर्ष १४–१५ साठी भांडवली खर्च आणि भांडवलीकरण**

| **रूपये कोटी** | | **प्रत्यक्ष** | **एमटीआर आदेश** |
|---|---|---|---|
| भांडवली खर्च | डीपीआर | ३२.२० | – |
| | बिगर डीपीआर | ५.२२ | – |
| | **एकूण** | **३७.४२** | – |
| भांडवलीकरण | डीपीआर | २९.६५ | २४.२६ |
| | बिगर डीपीआर | ४.९४ | २.१९ |
| | **एकूण** | **३४.६०** | **२६.४५** |

### २.१.१ वित्तपुरवठा योजना

आर्थिक वर्ष  १०–११ पर्यंत आरइन्फ्रा–टी अंतर्गत कर्ज उभारणीतून भांडवली खर्चाला वित्तपुरवठा करत आहे. तथापि, आर्थिक वर्ष ११–१२ पासून आरइन्फ्रा–टी मुंबई पारेषण मजबुतीकरण योजनाअंतर्गत नियोजित भांडवली खर्चासाठी वित्तपुरवठा संस्थांकडून कर्जे घेत आहे.

आरइन्फ्रा–टीने साऊथ इंडियन बँकेकडून ३०० कोटी रूपयांचे कर्ज घेतले असून त्यामुळे आर्थिक वर्ष ११–१२ साठी प्रगतीपथावरील कामे सुरू करण्यासोबत निकषात्मक कर्ज भांडवल बदलले गेले आणि त्याचा वापर आर्थिक वर्ष ११–१२ दरम्यान भांडवली खर्चाला वित्तपुरवठा करण्यासाठीही करण्यात आला. तसेच आर–इन्फ्राटीने बँक ऑफ महाराष्ट्रकडून आर्थिक वर्ष १२–१३ दरम्यान २५० कोटी रूपयांचे कर्ज घेतले होते. या कर्जाचा मोठा भाग १ एप्रिल २०१२ रोजी नुसार घेतलेल्या निकषात्मक कर्जाची अदलाबदल करण्यासाठी वापरला गेला आणि उर्वरित शिल्लक १ एप्रिल २०१२ नुसार सुरू असलेल्या भांडवली कामांची सुरूवात करण्यासाठी तडजोड करण्यात आली.

त्याशिवाय आर्थिक वर्ष १२–१३ दरम्यान आरइन्फ्रा–टीला स्टेट बँक ऑफ हैदराबाद आणि कॉर्पोरेशन बँक यांच्याकडूनही कर्जे मिळाली असून त्यांचा वापर आर्थिक वर्ष १२–१३, आर्थिक वर्ष १३–१४, आर्थिक वर्ष १४–१५ आणि आर्थिक वर्ष १५–१६ दरम्यान भांडवली खर्चाला वित्तपुरवठा करण्यासाठी केला आहे.

उपरोल्लिखित कर्जांखेरीज कर्ज समभाग प्रमाण ७०:३० राखण्याच्या उद्देशाने घेतलेले सर्व कर्ज एमवायटी नियमावली २०११ नुसार अचूक समायोजन करण्यासाठी “निकषात्मक” कर्ज म्हणून मानले आहे.

### २.१.२ कर्ज भांडवलावर व्याज

आरइन्फ्रा–टी सादर करत आहे की खटला क्रमांक २२१/ २०१४ मध्ये माननीय आयोगाने २६.०६.१५ रोजी दिलेल्या एमटीआर आदेशात आरइन्फ्रा–टी साठी आर्थिक वर्ष १४–१५ साठी प्रत्यक्ष अधिभारित सरासरी व्याज दर ११.९३ टक्के मोजला आहे.

त्यानुसार, ११.९३ टक्के व्याजदर आर्थिक वर्ष १४–१५ च्या निकषात्मक सरासरी कर्ज शिलकींवर लागू करण्यात आला आहे जे पुनर्परतव्याच्या समकक्ष घसारा वापरून निश्चित करण्यात आले आहे.

### २.१.३ घसारा

एमवायटी नियमावली २०११ च्या नियम क्रमांक ३१ मध्ये घसारा मोजण्यासाठी पद्धत दिलेली आहे. घसारा सदर नियमावलीनुसार मोजला गेला आहे. घसाऱ्याचा दावा आरंभीच्या जीएफएवर (एकूण स्थिर मालमत्तांवर) आणि या वर्षादरम्यान समाविष्ट करण्यात आलेल्या मालमत्तांवर (बेरीज केलेल्या प्रत्यक्ष तारखेवर प्रमाणानुसार आधारित) करण्यात आला आहे.

### २.१.४ समभागांवर परतावा

आर्थिक वर्ष १४–१५ साठी समभागांवर परतावा (आरओई) एमवायटी नियमावली २०११ च्या नियम ३२.२ नुसार म्हणजे वर्षाच्या आरंभीला समभाग भांडवलावर अधिक वर्षभरात भांडवलीकरण करण्यात आलेल्या मालमत्तांच्या समभाग भागांच्या ५० टक्क्यांवर १५.५ टक्के दराने मोजण्यात आला आहे.

## २.२ संचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च

### २.२.१ एमवायटी नियमावलींनुसार निकष

आर्थिक वर्ष १४–१५ दरम्यान प्रत्यक्ष मालमत्ता बेरजेवर आधारित एमवायटी नियमावली २०११ च्या नियम ६१.५ मध्ये नमूद केलेल्या निकषांनुसार आर्थिक वर्ष १४–१५ दरम्यान भर घातलेल्या प्रत्यक्ष मार्गिका आणि लाइनच्या रूंदींचा विचार करून संचालन आणि देखभाल खर्च मोजण्यात आला आहे. निकषांनुसार एकूण संचालन आणि देखभाल खर्च ४०.९० कोटी रूपये होतो. त्याची तुलना आर्थिक वर्ष १४–१५ साठीच्या प्रत्यक्ष संचालन आणि देखभाल खर्चांसोबत करण्यात आली आहे. कॉर्पोरेट तरतुदींशिवाय प्रत्यक्ष खर्च ४०.८१ कोटी रूपये झाला असून कॉर्पोरेट तरतुदींसह तोच खर्च ४३.०६ कोटी रूपये मोजला जातो.

### २.२.२ संचालन आणि देखभालीमध्ये कार्यक्षमता प्राप्ती/नुकसान

संचालन आणि देखभाल खर्चातील बदलाचे मुख्य कारण एमवायटी नियमावली,२०११ च्या १२.२ (ग)नुसार नियंत्रित करण्याजोगे घटक आहेत. निकषांच्या बदल्यात प्रत्यक्ष संचालन आणि देखभाल खर्चांनुसार या खर्चांतील बदल मोजण्यात आले आहेत.

निकषात्मक खर्चाची, ४०.९० कोटी रूपये, तुलना प्रत्यक्ष खर्चाशी म्हणजे ४०.८१ कोटी रूपये (कॉर्पोरेट वाटप वगळता) केली असता ०.०९ कोटी रूपयांचा नियंत्रणयोग्य कार्यक्षमता फायदा झाला आहे आणि त्यामुळे निकषांचा भाग म्हणून कॉर्पोरेट तरतुदींचा समावेश करण्यात आला नव्हता.

एमवायटी नियमावली २०११ च्या नियम क्रमांक १४.१ मध्ये नियंत्रणयोग्य घटकांचा भाग म्हणून फायद्याच्या वाटपाची पध्दत दिली आहे. त्यामुळे सदर नियमावलींअंतर्गत फायद्यांचा २/३ भाग म्हणजे ०.०६ कोटी रूपयांचा दावा एआरआरमध्ये करण्यात आला आहे.

### २.२.३ संचालनाशी संबंधित अतिरिक्त खर्च

आरइन्फ्रा–टीने, खटला क्रमांक १४१/२०१२ मध्ये एमवायटी याचिकेत सादर केले होते की, नवीन घटना तसेच विशिष्ट खर्च ओळख/ पुनर्समूहीकरण जे आरइन्फ्रा–टीकडून पारेषण आणि वितरण उद्योगात केले जात आहे त्यामुळे काही अतिरिक्त खर्च होऊ लागले आहेत. आरइन्फ्रा–टीने नमूद केले होते की, हे खर्च एमवायटी निकषांच्या विकासासाठी वापरण्यात आलेल्या ऐतिहासिक संचालन आणि देखभाल खर्चाचा भाग नव्हते.

माननीय आयोगाने १३.०६.१३ रोजीच्या एमवायटी आदेश तसेच २६.०६.१५च्या एमवायटी आदेशात दयाळूपणाने निकषांनुसार लागू असलेल्या संचालन आणि देखभाल खर्चांखेरीज अशा खर्चांना मान्यता दिली होती. उपरोल्लिखितनुसार आरइन्फ्रा–टी या शीर्षांखाली आर्थिक वर्ष १४–१५ साठी प्रत्यक्ष खर्चांची मागणी करत आहे.

उपरोल्लिखितनुसार आरइन्फ्रा–टीकडून दावा करण्यात आलेले आर्थिक वर्ष १४–१५ साठीचे प्रत्यक्ष संचालन आणि देखभाल खर्च खालीलप्रमाणे आहेतः

**तक्ता २ : सारांश– आर्थिक वर्ष १४–१५ साठी प्रत्यक्ष संचालन आणि देखभाल खर्च**

| संचालन आणि देखभाल खर्च आर्थिक वर्ष १४–१५ (रूपये कोटी) | प्रत्यक्ष | एमटीआर आदेश/ निकषात्मक | तफावत |
|---|---|---|---|
| संचालन आणि देखभाल खर्च (कॉर्पोरेट तरतूद वगळून) | ४०.८१ | ४०.९० | (०.०९) |
| आरइन्फ्रा–टीने राखलेला २/३ कार्यक्षमता फायदा | ०.०६ | – | ०.०६ |
| कॉर्पोरेट तरतूद | २.२५ | २.२७ | (०.०१) |
| ऊर्जा शुल्क | ३.९९ | ४.१५ | (०.१६) |
| स्काडा शुल्क | १.०१ | १.०६ | (०.०५) |
| भू वापर शुल्क | ३.६८ | ३.६८ | – |
| **एकूण** | **५१.८०** | **५२.०५** | **(०.२५)** |

### २.३ खेळत्या भांडवलावर व्याज

एमवायटी नियमावली २०११च्या नियम क्रमांक ३५.२ नुसार चालू भांडवली आवश्यकता मोजण्यात आली आहे. माननीय आयोगाने खटला क्रमांक २२१/ २०१४ मध्ये जारी केलेल्या एमटीआर आदेश दिनांक २६.०६.१५ मध्ये मान्यता दिल्यानुसार म्हणजे १४.५० टक्के व्याजदर विचाराधीन घेण्यात आला आहे.

### २.४ आपतकालीन साठ्यात योगदान

आपतकालीन साठ्यात योगदान एमवायटी नियमावली २०११च्या नियम क्रमांक ३६.१ नुसार म्हणजे आरंभीच्या जीएफएच्या ०.२५ टक्के मोजण्यात आले आहे.

### २.५ प्राप्तीकर

आरइन्फ्रा–टीने आर्थिक वर्ष १४–१५ साठी पारेषण उद्योगासाठी एकल नियामक करपूर्व नफ्यावर (पीबीटी) आधारित प्राप्तीकरण मोजला आहे. या पद्धतीचा वापर माननीय आयोगाकडून खटला क्रमांक २२१/२०१४ मध्ये आर्थिक वर्ष १२–१३ आणि आर्थिक वर्ष १३–१४ साठी अचूक समायोजनाचे आदेश जारी करताना केला गेला आहे.

आर इन्फ्रा–टीने कॉर्पोरेट कर दरावरही प्राप्तीकर मोजला असून पुस्तकी नफ्याच्या मॅट दरावरही सूत्रांनुसार करपात्र उत्पन्न निश्चित केल्यावर मोजला आहे. त्या दोघांपैकी जास्त असलेल्याचा विचार आर्थिक वर्ष १४–१५ साठी परवानगीयोग्य प्राप्तीकर म्हणून निश्चित करण्यात आले आहे.

### २.६ आर्थिक वर्ष १४–१५ साठी महसूल

#### २.६.१ इनएसटीएसकडून महसूल

माननीय आयोगाने आपल्या खटला क्रमांक ५६/२०१३ मधील १३.०५.१३ तारखेच्या आदेशानुसार आर्थिक वर्ष १४–१५ पासून इनएसटीएस दरपत्रकाला मान्यता दिली असून ते ०१.४.१४ पासून लागू होणार आहे ज्यानुसार आरइन्फ्रा–टीला दरसाल ३२६.१५ कोटी रूपये म्हणजे दरमाह २७.१८ कोटी रूपये मिळणार आहेत.

आर्थिक वर्ष १४–१५ साठी माननीय आयोगाने आपल्या खटला क्रमांक १२३/ २०१४ मधील १४.०८.१४ तारखेच्या आदेशानुसार आर्थिक वर्ष १४–१५ साठी इनएसटीएस दरपत्रकाला मान्यता दिली असून ते ०१.०९.१४ पासून लागू होईल ज्यानुसार आरइन्फ्राला दरसाल ३११.१८ कोटी रूपये म्हणजे मासिक स्तरावर २५.९३ कोटी रूपये मिळतील.

त्यामुळे पारेषण शुल्कातून महसूल ३१७.४२ कोटी रूपये (२७.१८ कोटी रूपये मासिक ५ महिन्यांसाठी आणि ७ महिन्यांसाठी मासिक २५.९३ कोटी रूपये) विचाराधीन घेण्यात आला आहे.

#### २.६.२ बिगरदर उत्पन्न

आरइन्फ्रा–टीने खालील शीर्षांअंतर्गत बिगरदर उत्पन्न विचाराधीन घेतले आहेः

- आपतकालीन साठा गुंतवणुकीवर व्याजः आपतकालीन साठा गुंतवणूक भारत सरकारच्या रोख्यांमध्ये केली जाते आणि त्यानुसार व्याज मोजले आहे.

- रोखीकृत नुकसानः विविध उपकरणांच्या निश्चित केलेल्या डिलिव्हरी तारखेत उशीर झाल्यामुळे वितरकांकडून प्राप्त झालेले रोखीकृत नुकसान एनटीआय म्हणून गृहित धरले आहे.

- अदलाबदलीतील फायदा/नुकसानाची मोजणी: साहित्य प्राप्त केल्याची तारीख आणि प्रत्यक्ष प्रदानाची तारीख/ वर्षाअखेरीच्या तारखेमुळे दरातील तफावतीमुळे परकीय चलनाचा फायदा/(नुकसान) एनटीआयमध्ये विचाराधीन घेतली आहे.

- भंगाराची विक्री: भंगार विकून प्राप्त केलेली रक्कम एनटीआयमध्ये विचाराधीन घेतली आहे.

- भू वापरातून येणारे भाडेउत्पन्नः आरइन्फ्रा–टीला आरइन्फ्रा–टी आणि आरइन्फ्रा–डीमध्ये झालेल्या सामंजस्य कराराच्या आधारावर आरइन्फ्रा–डीकडून भू वापर शुल्कासाठी भाडेशुल्क मिळत आहे. त्याचाच विचार एनटीआय म्हणून करण्यात आला आहे.

### २.६.३ इतर उद्योगांतून येणारे उत्पन्न

आरइन्फ्राने आपल्या उपकेंद्र रूफटॉप्सवर रिलायन्स कम्युनिकेशन्स लि.च्या बीटीएस टॉवर्स साठी भाड्याने दीली आहे. आरइन्फ्रा–टी नमूद करत आहे की, अशा इतर उद्योगांमधून येणारे उत्पन्न कराच्या निव्वळ मानले जावे आणि त्यानंतर करानंतरच्या निव्वळ उत्पन्नाचा एक तृतीयांश भाग एआरआरमधून वजा करण्यात यावा. एमवायटी नियमावली २०११ च्या नियम ६३.१ नुसार आरइन्फ्रा–टीने कर वजा केल्यावर निव्वळ प्राप्त झालेल्या रकमेच्या एक तृतीयांश म्हणजे ०.०२ कोटी रूपये आर्थिक वर्ष १४–१५ साठीच्या इतर उद्योगांतून आलेले उत्पन्न म्हणून विचाराधीन घेतले आहे.

### २.६.४ आरइन्फ्रा–टी नेटवर्कच्या उपलब्धतेवर प्रोत्साहन

महाराष्ट्र राज्य भार प्रवाहन केंद्र (एमएसएलडीसी)ने आरइन्फ्रा–टी साठी आर्थिक वर्ष १४–१५ साठी पारेषण यंत्रणेची उपलब्धता ९९.८१% प्रमाणीकरण केले आहे.

एमवायटी नियमावली २०११ चे नियम क्रमांक ६०.१ आणि ६०.२ एकत्रित वाचले असता आरइन्फ्रा–टीने पारेषण उपलब्धतेवर उपलब्धतेला ९९.७५ टक्क्यांपर्यंत मर्यादित करून प्रोत्साहनात्मक दर मोजले आहेत. प्रोत्साहन निश्चित करण्यासाठी वार्षिक पारेषण शुल्क बिगर दर उत्पन्न आणि इतर उद्योगांतून येणारे उत्पन्न वजा जाता निव्वळ मोजण्यात आले आहे. प्रोत्साहन रक्कम ४.७३ कोटी रूपये आहे.

## २.७ आर्थिक वर्ष १४–१५ साठी महसुली तफावत/अतिरिक्त

इनएसटीएस आणि एकूण महसुली आवश्यकता (बिगरदर उत्पन्न आणि इतर उद्योगातून आलेले उत्पन्न) यांच्या निव्वळ महसुलाची तुलना करून महसुली आर्थिक वर्ष १४–१५ साठी तफावत/ अतिरिक्त महसूल मोजण्यात आली आहे.

आर्थिक वर्ष १४-१५ साठी एआरआरचा सारांश खालील तक्त्यात देण्यात आला आहेः

**तक्ता ३ : आर्थिक वर्ष १४-१५ साठी अचूक समायोजन सारांश**

| अनु. क्र. | तपशील (रूपये कोटी) | प्रत्यक्ष | एमटीआर आदेश | तफावत |
|---|---|---|---|---|
| | **खर्च** | | | |
| १ | संचालन आणि देखभाल खर्च | ५१.७४ | ५२.०५ | (०.३१) |
| २ | दीर्घकालीन कर्जभांडवलावर व्याज | ७३.७४ | ७३.४० | ०.३४ |
| ३ | घसारा | ५९.५७ | ५९.५७ | ०.०० |
| ४ | समभागांवर तफावत | ७२.३० | ७२.११ | ०.१९ |
| ५ | खेळत्या भांडवलावर व्याज | ६.७७ | ६.८१ | (०.०४) |
| ६ | आपतकालीन साठ्यात योगदान | ३.५० | ३.५० | - |
| ७ | प्राप्तीकर | २९.०९ | १.०१ | २८.०८ |
| **अ** | **एकूण खर्च** | **२९६.७१** | **२६८.४५** | **२८.२६** |
| ८ | उपलब्धता प्रोत्साहन | ४.७३ | - | ४.७३ |
| ९ | संचालन आणि देखभाल खर्चावरील कार्यक्षमता फायदा | ०.०६ | - | ०.०६ |
| **ब** | **एकूण एआरआर** | **३०१.५०** | **२६८.४५** | **३३.०५** |
| | **महसूल** | | | |
| १० | इनएसटीएसमधून महसूल | ३१७.४२ | ३१७.४२ | - |
| ११ | बिगरदर उत्पन्न | २.५५ | २.३२ | ०.२३ |
| १२ | इतर उद्योगांतून उत्पन्न | ०.०२ | ०.०४ | (०.०१) |
| **क** | **एकूण महसूल** | **३१९.९९** | **३१९.७७** | **०.२२** |
| | **महसुली तफावत / अतिरिक्त = (ब - क)** | **(१८.४९)** | **(५१.३३)** | **३२.८४** |

आरइन्फ्रा-टी माननीय आयोगाला विनंती करत आहे की त्यांनी खर्च आणि महसुलाला मान्यता द्यावी आणि आर्थिक वर्ष १४-१५ साठीच्या अचूक समायोजनासाठी त्याचा विचार करावा.

### ३. आर्थिक वर्ष १५-१६ साठी तात्पुरते अचूक समायोजन

या विभागात आरइन्फ्रा-टी पहिल्या सहामाहीतील (एच१) अलेखाकृत प्रत्यक्षावर आधारित आर्थिक वर्ष १५-१६ साठी तात्पुरते खर्च आणि महसूल आणि दुसऱ्या सहामाहीसाठी (एच२) अंदाज सादर करत आहे. आरइन्फ्रा-टी माननीय आयोगाला आर्थिक वर्ष १५-१६ साठी तात्पुरते अचूक समायोजन करण्याची विनंती करत आहे.

#### ३.१ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आर्थिक वर्ष १५-१६ च्या पहिल्या सहामाहीत आरइन्फ्रा-टीला भांडवली खर्चासाठी १४.९१ कोटी रूपये खर्च आला असून भांडवलीकरणासाठी १०.१६ कोटी रूपये खर्च आला आहे. आरइन्फ्रा-टीने ९९.४३ कोटी रूपयांचा भांडवली खर्च

आणि ५४.७८ कोटी रूपयांचे भांडवलीकरण आर्थिक वर्ष १५–१६च्या दुसऱ्या सहामाहीदरम्यान वैयक्तिक योजनांची प्रगती लक्षात घेऊन दर्शवले आहे.

आर्थिक वर्ष १५–१६ साठी भांडवली खर्च आणि भांडवलीकरणाचा सारांश खालीलप्रमाणे आहेः

**तक्ता ४ : सारांश– आर्थिक वर्ष १५–१६ साठी भांडवली खर्च आणि भांडवलीकरण**

| **रू. कोटी** | | **अंदाज** | **एमटीआर आदेश** |
|---|---|---|---|
| भांडवली खर्च | डीपीआर | १०५.४८ | – |
| | बिगर डीपीआर | ८.८६ | – |
| | **एकूण** | **११४.३४** | – |
| भांडवलीकरण | डीपीआर | ५४.९४ | ११३.०२ |
| | बिगर डीपीआर | १०.०० | २१.२६ |
| | **एकूण** | **६४.९४** | **१३४.२८** |

### ३.१.१ वित्तपुरवठा योजना

आर्थिक वर्ष १४– १५च्या अंतानुसार आरइन्फ्रा–टीने विविध वित्तपुरवठा एजन्सींकडून नियामक कर्जाची शिल्लक दाखल केली आहे.

आरइन्फ्रा–टीने ताज्या भांडवल आणि खर्चासाठी किंवा आर्थिक वर्ष १५–१६ दरम्यान आरंभीच्या सीडब्ल्यूआयपीला पुनर्वित्त पुरवठा करण्यासाठी अद्याप जादा कर्जे घेतलेली नाहीत आणि त्यामुळे आर्थिक वर्ष १५–१६ दरम्यान संपूर्ण भांडवली गुंतवणूक नियमावलीनुसार केवळ निकषात्मक कर्ज आणि समभागांद्वारे ७०:३० टक्के प्रमाणात करण्याचा प्रस्ताव आहे.

### ३.१.२ कर्ज भांडवलावर व्याज

आरइन्फ्रा–टी सादर करत आहे की, माननीय आयोगाने खटला क्रमांक. २२१/ २०१४ मध्ये २६.०६.१५ रोजीच्या एमटीआर आदेशात आरइनफ्रा–टीसाठी आर्थिक वर्ष १५–१६ साठी सरासरी अधिभारित व्याजदर ११.९४ टक्के मोजला आहे.

त्यानुसार आर्थिक वर्ष १५–१६ साठी निकषात्मक सरासरी कर्ज शिलकीवर ११.९४ टक्के व्याजदर लागू करण्यात आला आहे जे घसाऱ्याच्या समकक्ष पुनर्परतावणी वापरून निश्चित करण्यात आले आहे.

### ३.१.३ घसारा

एमवायटी नियमावली २०११ च्या नियम क्रमांक ३१ मधून घसारा मोजण्याची पद्धत देण्यात आली आहे. घसारा सदर नियमावलीनुसार मोजला जातो. घसाऱ्याचा दावा आरंभीच्या जीएफएवर (एकूण स्थिर मालमत्ता) आणि आर्थिक वर्ष

१५–१६ च्या पहिल्या सहामाही दरम्यान मिळवण्यात आलेल्या मालमत्तांवर करण्यात आला आहे. घसारा भांडवलीकरणाच्या प्रत्यक्ष तारखेवर आधारित गृहित धरण्यात आला आहे. आर्थिक वर्ष १५–१६च्या दुसऱ्या सहामाही दरम्यान मिळवण्यात येणाऱ्या मालमत्तांबाबत घसारा केवळ अशा कालावधीच्या मधल्या टप्प्यावरील बेरजेचा विचार करून मोजण्यात आला आहे.

### ३.१.४ समभागांवर परतावा

आर्थिक वर्ष १५–१६ साठी समभागांवर परतावा एमवायटी नियमावली २०११ च्या नियम क्रमांक ३२.२ वर आधारित म्हणजे वर्षाच्या सुरुवातीला समभाग भांडवलावर अधिक वर्षाच्या कालावधीत भांडवलीकरण करण्यात आलेल्या समभाग भागाच्या ५० टक्क्यांवर १५.५ टक्के दराने मोजण्यात आला आहे.

## ३.२ संचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च

### ३.२.१ एमवायटी नियमावलीनुसार निकष

आर्थिक वर्ष १५–१६ साठी आरइन्फ्रा–टीने एमवायटी नियमावली २०११ (नियम क्रमांक ६१.५) मध्ये दिलेल्या निकषांनुसार ओअँडएम खर्चांचा अंदाज मार्गिका आणि रेषांच्या लांबींच्या संख्येवर आधारित राहून दिला आहे ज्या आर्थिक वर्ष १५–१६ दरम्यान भांडवलीकरण भाकितावर आधारित राहून काढले आहेत.

### ३.२.२ संचालनाशी संबंधित अतिरिक्त खर्च

उपरोल्लिखित “आर्थिक वर्ष १४–१५ साठीच्या अचूक समायोजनाच्या” विभागात स्पष्ट केल्यानुसार आरइन्फ्रा–टी आर्थिक वर्ष १४–१५ साठी अंदाजित खर्चाचा दावा स्काडा शुल्क, ऊर्जा शुल्क, भू वापर शुल्क आणि कॉर्पोरेट वाटप या शीर्षांखाली केला आहे.

वरील आधारावर एआरआरमध्ये विचाराधीन घेतलेले ओ अँड एम खर्च खालीलप्रमाणे असतीलः

**तक्ता ५ः सारांश– आर्थिक वर्ष १५–१६ साठी प्रत्यक्ष संचालन आणि देखभाल खर्च**

| **आर्थिक वर्ष २०१५–१६ ओ अँड एम खर्च (रूपये कोटी)** | **अंदाजित** | **एमटीआर आदेश** | **तफावत** |
|---|---|---|---|
| निकषात्मक ओ अँड एम खर्च | ४३.२२ | ४३.२२ | (०.०१) |
| कॉर्पोरेट वाटप | २.३४ | २.४८ | (०.१४) |
| ऊर्जा शुल्क | ३.९८ | ४.१५ | (०.१७) |
| स्काडा शुल्क | १.२७ | १.१६ | ०.११ |
| भू वापर शुल्क | ३.८६ | ३.८६ | – |
| **एकूण** | **५४.६७** | **५४.८८** | **(०.२०)** |

### ३.३ खेळत्या भांडवलावर व्याज

एमवायटी नियमावली २०११ च्या नियम ३५.२ नुसार खेळत्या भांडवलाची आवश्यकता मोजण्यात आली आहे. माननीय आयोगाने खटला क्रमांक २२१/२०१४ मधील २६.०६.२०१५ रोजीच्या एमटीआर आदेशात मान्यता दिल्याप्रमाणे म्हणजे १४.७५ टक्के व्याजदर विचाराधीन करण्यात आला आहे.

### ३.४ आपतकालीन साठ्यात योगदान

आपतकालीन साठ्यातील योगदान एमवायटी नियमावली २०११ च्या नियम क्रमांक ३६.१ म्हणजे आरंभीच्या जीएफएच्या ०.२५ टक्क्यांनुसार मोजण्यात आले आहे.

### ३.५ प्राप्तीकर

एमवायटी नियमावली २०११ नुसार मागील वर्षाच्या प्रत्यक्ष प्राप्तीकरानुसार प्राप्तीकराला तात्पुरत्या स्वरूपात मान्यता देण्याची आवश्यकता आहे. सदर याचिकेत आरइन्फ्रा–टीला आर्थिक वर्ष १४–१५ साठी देय असलेला प्रत्यक्ष प्राप्तीकर माननीय आयोगाच्या संरचनांनुसार, नियामक पीबीटी आणि पुस्तकी नफ्याचा विचार करून काढण्यात आला आहे. त्याचा विचार आर्थिक वर्ष १५–१६ साठीच्या तात्पुरत्या अचूक समायोजनासाठीही करण्यात आला आहे.

### ३.६ आर्थिक वर्ष १५–१६ साठी महसूल

#### ३.६.१ इनएसटीएससाठी महसूल

माननीय आयोगाच्या खटला क्रमांक १२३/ २०१४ मधील १४.०८.१४ च्या आदेशांनुसार आर्थिक वर्ष १५–१६ साठी आरइन्फ्रा–टी साठी मान्यताप्राप्त इनएसटीएस दरपत्रक दरसाल ३९९.७५ कोटी रूपये म्हणजे दरमहा ३३.३१ कोटी रूपये आहे. माननीय आयोगाने आपल्या खटला क्रमांक ५७/ २०१५ मधील २६.०६.१५ रोजीच्या आदेशानुसार ०१.०६.१५ पासून लागू इनएसटीएस दरपत्रक आर्थिक वर्ष १५–१६ साठी मान्य केले आहे ज्यानुसार आरइन्फ्रा–टीला दरमहा १७.४१ कोटी रूपये (दरसाल २०८.८६ कोटी रूपये) मिळतील.

आर्थिक वर्ष १५–१६ साठी पारेषण शुल्कातून महसूल २४०.६८ कोटी रूपये विचाराधीन (दोन महिन्यांसाठी दरमहा ३३.३१ कोटी रूपये आणि १० महिन्यांसाठी दरमहा १७.४१ कोटी रूपये) घेण्यात आला आहे.

#### ३.६.२ बिगरदर उत्पन्न

आरइन्फ्रा–टीने आर्थिक वर्ष १५–१६ साठी बिगरदर उत्पन्नाचा विचार आपतकालीन साठा गुंतवणूक, कर्मचारी कर्ज आणि आगाऊ रकमेवर व्याज, रोखीकृत नुकसान, हस्तांतरणाच्या नुकसानाप्रति परतावा, भंगारविक्री आणि भू वापरातून आलेले भाडे उत्पन्न या शीर्षांखाली केला आहे. या शीर्षांखालील उत्पन्नाचा प्रकार आर्थिक वर्ष १४–१५ साठीचे अचूक समायोजनातील संबंधित विभागात स्पष्ट करण्यात आले आहे. याशिवाय आरइन्फ्रा–टीने एनटीआय, विलंब प्रदान शुल्क

(डीपीसी) रक्कम ३५.०२ कोटी रूपये एनटीआय मध्ये घेतलेली नाही जी माननीय आयोगाकडून एमटीआर आदेश मध्ये विचाराधीन घेण्यात आली होती.

### ३.६.३ इतर उद्योगातून उत्पन्न

आरइन्फ्रा–टीने आर्थिक वर्ष १४–१५ साठी इतर उद्योगातून उत्पन्न म्हणून ०.०२ कोटी रूपये म्हणून विचाराधीन घेण्यात आले असून तेच आर्थिक वर्ष १५–१६ साठीही विचाराधीन घेण्यात आले आहे.

## ३.७ आर्थिक वर्ष १५–१६ साठी तात्पुरती महसुली तफावत/अतिरिक्त

आर्थिक वर्ष १५–१६ साठी तात्पुरती महसुली तफावत/अतिरिक्त इनएसटीएसमधून आलेला महसूल आणि एकूण महसुली आवश्यकता (बिगरदर उत्पन्न आणि इतर उद्योगांतील उत्पन्न यांच्या निव्वळ मोजून काढण्यात आला आहे.

आर्थिक वर्ष १५–१६ साठी एआरआरचा सारांश खालीलप्रमाणे तक्तयात मोजण्यात आला आहेः

**तक्ता ६ः आर्थिक वर्ष १५–१६ साठी तात्पुरती तफावत/अतिरिक्त**

| अनु. क्र. | तपशील (रूपये कोटी) | अंदाजित | एमटीआर आदेश | तफावत |
|---|---|---|---|---|
| | **खर्च** | | | |
| १ | संचालन आणि देखभाल खर्च | ५४.६७ | ५४.८८ | (०.२०) |
| २ | दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज | ७०.७० | ७२.८३ | (२.१३) |
| ३ | घसारा | ६१.७९ | ६३.१२ | (१.३३) |
| ४ | समभागावर परतावा | ७४.६१ | ७५.८४ | (१.२३) |
| ५ | चालू भांडवलावर व्याज | ५.३९ | ४.९६ | ०.४३ |
| ६ | आपतकालीन साठ्यात योगदान | ३.५९ | ३.५७ | ०.०२ |
| ७ | प्राप्तीकर | २९.०९ | १.०१ | २८.०८ |
| **अ** | **एकूण खर्च** | **२९९.८४** | **२७६.२१** | **२३.६३** |
| | **इनएसटीएसशिवाय इतर ठिकाणचा महसूल** | | | |
| ८ | वजाः बिगरदर उत्पन्न | २.९६ | ३७.६५ | (३४.६९) |
| ९ | वजाः इतर उद्योगांमधून उत्पन्न | ०.०२ | ०.०४ | (०.०१) |
| **ब** | **एआरआर** | **२९६.८५** | **२३८.५२** | **५८.३३** |
| क | पुढे नेण्याच्या खर्चासह आर्थिक वर्ष १३–१४ पर्यंत एकूण महसुली तफावत | १२.९४ | १२.९४ | – |
| ड | आर्थिक वर्ष १४–१५ साठी महसुली तफावत / (अतिरिक्त) | (५१.३३) | (५१.३३) | – |
| इ | अपील क्रमांक १३९/ २०१२ साठी एटीई आदेशाचा परिणाम | ८.७२ | ८.७२ | – |
| **फ** | **निव्वळ एआरआर (ब+क+ड+इ)** | **२६७.१९** | **२०८.८६** | **५८.३३** |

| अनु. क्र. | तपशील (रूपये कोटी) | अंदाजित | एमटीआर आदेश | तफावत |
|---|---|---|---|---|
| ग | इनएसटीएसमधून महसूल | २४०.६८ | २०८.८६ | ३१.८१ |
| **ह** | **तात्पुरती महसुली तफावत/(अतिरिक्त) आर्थिक वर्ष १५–१६ साठी (फ – ग)** | **२६.५२** | **०.००** | **२६.५२** |

सादर करण्यात येत आहे की, माननीय आयोगाने एमटीआर आदेशात मान्यता दिल्यानुसार आर्थिक वर्ष १४–१५ साठी महसुली तफावत/ (अतिरिक्त) आरइन्फ्रा–टीने अंदाजाच्या बाजूला विचाराधीन घेतली आहे. माननीय आयोगाने मान्यता दिलेली तफावत आणि आर्थिक वर्ष १४–१५ साठी आरइन्फ्रा–टीने सादर केल्यानुसार अचूक समायोजनातील तफावत यांच्यामुळे वाढीव तफावत/ अतिरिक्त पारेषण दरपत्रकातून आर्थिक वर्ष १६–१७ साठी वसुलीसाठी मिळवण्यात आली आहे. आर्थिक वर्ष १५–१६ साठी तात्पुरती महसुली तफावत/अतिरिक्त आर्थिक वर्ष १६–१७च्या एआरआरमध्ये मिळवण्यात आली आहे.

**४. आर्थिक वर्ष १६–१७ते आर्थिक वर्ष १९–२० साठी एआरआर**

या विभागात आरइन्फ्रा–टी आर्थिक वर्ष १६–१७ ते आर्थिक वर्ष १९–२० या कालावधीसाठी एमवायटी नियमावली २०१५ च्या सुसंगत नियमावलींच्या तरतुदींसाठी एआरआर सादर करत आहे.

**४.१ भांडवली गुंतवणूक योजना**

आरइन्फ्रा–टीची आर्थिक वर्ष १६–१७ ते आर्थिक वर्ष १९–२० या नियंत्रण कालावधीसाठी भांडवली गुंतवणूक योजना खालीलप्रमाणे समूहात विभाजित करण्यात आली आहेः

- समूह अः माननीय आयोगाने आधीच मान्यता दिलेल्या डीपीआर योजना
- समूह बः तत्वतः मान्यतेसाठी माननीय आयोगाला सादर केलेल्या नियंत्रण कालावधीसंबंधी डीपीआर योजना
- समूह कः माननीय आयोगाने यापूर्वी मान्यता दिलेल्या डीपीआर योजना परंतु ज्यासाठी सुधारित डीपीआर किमतीत बदल झाल्यामुळे संबंधित वेळे माननीय आयोगाकडे सादर करण्यात येतील.
- समूह डः आरइन्फ्रा–टीकडून विचार घेतल्या गेलेल्या नवीन डीपीआर योजना माननीय आयोगाकडे संबंधित वेळेत तत्वतः मान्यतेसाठी सादर केल्या जातील.
- बिगर डीपीआर गुंतवणूक

उपरोल्लिखितवर आधारित, नियंत्रण कालावधीसाठी अंदाजित योजनानिहाय भांडवली खर्च आणि भांडवलीकरण खालीलप्रमाणे आहे. भांडवल केलेल्या मूल्यात कामासाठी भांडवलीकरण झालेली रक्कम, संबंधित खर्च आणि बांधकामादरम्यानचे व्याज (आयडीसी) यांचा समावेश आहे.

**तक्ता ७: नियंत्रण कालावधीदरम्यान भांडवली खर्च**

| **(रूपये कोटी)** | **आर्थिक वर्ष १६–१७** | **आर्थिक वर्ष १७–१८** | **आर्थिक वर्ष १८–१९** | **आर्थिक वर्ष १९–२०** |
|---|---|---|---|---|
| समूह अ योजना | १६४.१९ | १५७.१२ | ३९.४८ | |
| समूह ब योजना | १६.५० | १११.१४ | ८.४४ | |
| समूह क योजना | २१४.१८ | १९३.७९ | ४१२.५३ | २६७.७३ |
| समूह ड योजना | ७.४३ | ५३.०९ | १२३.२१ | २१२.६२ |
| बिगर डीपीआर | १२.०० | २०.०० | २०.०० | २०.०० |
| **एकूण** | **४१४.३०** | **५३५.१४** | **६०३.६६** | **५००.३४** |

**तक्ता ८: नियंत्रण कालावधीदरम्यान आयडीसीसह भांडवलीकरण**

| **(रूपये कोटी)** | **आर्थिक वर्ष १६–१७** | **आर्थिक वर्ष १७–१८** | **आर्थिक वर्ष १८–१९** | **आर्थिक वर्ष १९–२०** |
|---|---|---|---|---|
| समूह अ योजना | ७४.७० | ३३५.४६ | ३९.४८ | |
| समूह ब योजना | | १२९.६२ | ८.४४ | |
| समूह क योजना | | | ६९७.५० | ४४३.०२ |
| समूह ड योजना | | ३.२४ | ८१.७७ | ३३०.०० |
| बिगर डीपीआर | ११.२७ | २०.०० | २०.०० | २०.०० |
| **एकूण** | **८५.९७** | **४८८.३२** | **८४७.१९** | **७९३.०२** |

### ४.१.१ वित्तपुरवठा योजना

भांडवली खर्च योजनांसाठी नियंत्रण कालावधीदरम्यान ताज्या स्वरूपात हाती घेण्याचा वित्तपुरवठा, सध्या कर्जःसमभाग भांडवलाच्या ७०ः३० रचनेनुसार विचाराधीन घेण्यात आला आहे, कारण सध्या कोणतेही ताजे कर्ज यापैकी कोणत्याही योजनेसाठी किंवा योजनांच्या समूहासाठी विचाराधीन घेण्यात आलेले नाही. नियंत्रण कालावधीदरम्यान कोणतेही प्रत्यक्ष कर्ज घेण्यात आलेले असल्यास ते एमवायटी नियमावली २०१५ अंतर्गत सुसंगत तरतुदींनुसार पुढे सादर करण्याच्या याचिकांदरम्यान दाखल करण्यात येईल.

### ४.१.२ कर्ज भांडवलावर व्याज

एमवायटी नियमावली, २०१५च्या नियम २९.५ मध्ये नमूद करण्यात आले आहे की, व्याजदर हा दर वर्षाच्या सुरूवातीला प्रत्यक्ष कर्जाच्या उत्पादनांच्या आधारावर मोजण्यात आलेला अधिभारित सरासरी व्याजदर असेल.

आरइन्फ्रा–टीने नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षाच्या १ एप्रिलनुसार प्रत्यक्ष संभाव्य कर्ज शिल्लक विविध बँकांच्या कर्ज पुनर्परताव्याच्या वेळापत्रकानुसार नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चपर्यंतच्या प्रत्यक्ष एकत्रित पुनर्परताव्याचा विचार करून मोजले आहे. प्रत्येक प्रत्यक्ष कर्जासाठी व्याजदर ही याचिका सादर करण्याच्या तारखेनुसार जो व्याजदर लागू आहे तोच विचाराधीन घेतला आहे. अधिभारित सरासरी व्याजदर हा विविध बँकांचे व्याजदर आणि नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाच्या १ एप्रिलनुसार देय असलेले प्रत्यक्ष कर्ज शिल्लक लक्षात घेऊन मोजण्यात आला आहे. अशा रितीने निश्चित केलेला व्याजदर त्यानंतर निकषात्मक कर्ज शिलकीवर लागू केला जातो (घसाऱ्याच्या समकक्ष पुनर्परतावा लक्षात घेतल्यानंतर) आणि एमवायटी नियमावली २०१५ नुसार एआरआरला लागू होणारा व्याजदर निश्चित करण्यासाठी केला जातो.

### ४.१.३ घसारा

नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षादरम्यान भूखंडाचा खर्च वगळता मालमत्तेत घातली जाणारी भर जी विशेषतः स्थावर मालमत्तेला लागू केली जाते ती प्रत्येक वित्तीय वर्षाच्या आरंभीच्या जीएफए इतक्याच प्रमाणात मानली जाते. भांडवली कामांना लागू होणारे व्याज (आयडीसी) हे इमारत आणि संयंत्र आणि मशीनरी यांना इमारत आणि संयंत्र आणि मशीनरी यांच्या आरंभीच्या जीएफएच्या प्रमाणात लागू केले जाते.

घसारा एमवायटी नियमावली २०१५ च्या नियम क्रमांक २७ नुसार मोजण्यात आला आहे. घसारा आरंभीच्या जीएफएवर आणि दरवर्षी भर पडण्याचा अंदाज असणाऱ्या मालमत्तेवर मोजण्यात आला असून घसारा अशा कालावधीत केलेल्या वाढीचा मध्यबिंदू काढून मोजला जातो.

### ४.१.४ समभागांवर परतावा

एमवायटी नियमावली २०१५ च्या नियम २८ वर आधारित समभागांवर परतावा म्हणजे वर्षाच्या सुरूवातीला समभाग भांडवलावर १५.५ टक्के दराने अधिक वर्षभरात भांडवलीकरण करण्यात आलेल्या समभाग भागांच्या ५० टक्क्यांवर १५.५ टक्के अधिक मोजले जातात.

## ४.२ संचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च

विविध भांडवली कामांच्या प्रस्तावित पूर्ततेवर आधारित, आरइन्फ्रा–टीने सर्किट किलोमीटर आणि मार्गिका कालावधीतील प्रत्येक वर्षासाठी भर घालण्याचा अंदाज केला आहे. मार्गिका आणि सर्किट किमी नियम ५८.४ मध्ये दिल्याप्रमाणे लागू करण्यात आले असून त्यातून आरइन्फ्रा–टीसाठी अंदाजित ओ अँड एम खर्च काढण्यात आला आहे.

**तक्ता ९: संचालन आणि देखभाल खर्च**

| **ओ अँड एम खर्च / कोटी रूपये** | **आर्थिक वर्ष १६–१७** | **आर्थिक वर्ष १७–१८** | **आर्थिक वर्ष १८–१९** | **आर्थिक वर्ष १९–२०** |
|---|---|---|---|---|
| सर्किट किमी पाया | ३.१९ | ३.४५ | ३.८४ | ४.२६ |
| मार्गिकांच्या संख्येचा पाया | ५३.३४ | ५७.६० | ६४.८५ | ७५.१५ |
| **एकूण** | **५६.५२** | **६१.०५** | **६८.७०** | **७९.४१** |

### ४.३ खेळत्या भांडवलावर व्याज

नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी खेळत्या भांडवलाची आवश्यकता एमवायटी नियमावली,२०१५च्या नियम क्रमांक ३१.२ नुसार मोजण्यात आली आहे. व्याजदर एमवायटी नियमावली २०१५च्या नियम क्रमांक ३१.२ (ब) मध्ये देण्यात आला आहे. सदर नियमानुसार सदर याचिका दाखल करताना एसबीआयचा पायाभूत दर ९.३ टक्के आहे ज्यात १५० पायाभूत गुण (१.५ टक्के) मिळवण्यात आले आहेत. त्यामुळे खेळत्या भांडवलावर व्याज काढण्यासाठी १०.८ टक्के दर विचाराधीन घेण्यात आला आहे.

### ४.४ आपतकालीन साठ्यात योगदान

एमवायटी नियमावली २०१५ मधून आपत्कालीन साठ्यातील योगदान (सीआर) आरंभीच्या जीएफएच्या ०.२५ टक्के देण्यात आले आहे. हेच नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी आरंभीच्या जीएफएलाही लागू करण्यात आले आहे.

### ४.५ प्राप्तीकर

एमवायटी नियमावली २०१५ च्या नियम ३३.१ द्वारे आरइन्फ्रा–टीसाठीचा प्राप्तीकर तात्पुरत्या स्वरूपात नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी विचाराधीन घेण्यात आला असून तो सदर याचिकेतील आर्थिक वर्ष १४–१५ साठी मोजण्यात आलेल्या पातळीइतकाच आहे.

### ४.६ महसूल

#### ४.६.१ बिगरदर उत्पन्न

नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षासाठी बिगरदर उत्पन्नाची प्रमुख शीर्षे खाली स्पष्ट केल्याप्रमाणे अंदाजित करण्यात आली आहेतः

- भू वापरातून भाडेउत्पन्न: आरइन्फ्रा–टी आणि आरइन्फ्रा–डी यांच्यामध्ये करण्यात आलेला सामंजस्य करार आर्थिक वर्ष १५–१६ पर्यंत वैध आहे. सामंजस्य कराराद्वारे एक नवीन तडजोड करण्यात येण्याची शक्यता असून ती ०१.०४.२०१६ पासून लागू होईल जी लागू असलेल्या सिद्धगणकाच्या दरावर आधारित असेल. तथापि, या क्षणी नवीन तडजोड अनुपस्थित असल्याने आणि तडजोडीवर अंमलबजावणी होण्याच्या वेळी लागू होऊ शकणाऱ्या सिद्धगणकाच्या दरांचे भाकीत करणे शक्य नसल्यामुळे नियंत्रण कालावधीत आरइन्फ्रा–डीकडून भू वापरातून येणारे भाडेउत्पन्न आर्थिक वर्ष १५–१६ चा विचार करून अंदाजित करण्यात आले आहे आणि ते सध्याच्या तडजोडीत मान्य केल्याप्रमाणे दरसाल ५ टक्के या दराने वाढीच्या घटकाने वाढवण्यात आले आहे.

- कर्मचारी कर्जे आणि आगाऊ रक्कम यांच्यावर व्याजः आर्थिक वर्ष १५–१६ साठी कर्मचारी कर्जे आणि आगाऊ रक्कम आर्थिक वर्ष १४–१५ साठी प्रत्यक्षावर आधारित ०.०७ कोटी रूपये अंदाजित करण्यात आली आहे. हीच रक्कम नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी विचाराधीन घेण्यात आली आहे.

- आपतकालीन साठ्याच्या गुंतवणुकीवर व्याजः आपतकालीन साठ्यांची गुंतवणूक भारत सरकारच्या सुरक्षांमध्ये केली जावी आणि त्यानुसार व्याज मोजण्यात आले

### ४.६.२ इतर उद्योगांतून उत्पन्न

सदर याचिकेत आधी स्पष्ट केल्याप्रमाणे आरइन्फ्रा–टीने आर्थिक वर्ष १४–१५ आणि आर्थिक वर्ष १५–१६ साठी इतर उद्योगांतून उत्पन्न म्हणून ०.०२ कोटी रूपये मानले आहे जे अशा इतर उद्योगांच्या महसुलाच्या १/३ आहे. एमवायटी नियमावली २०१५च्या नियम ६० मधून अशा इतर उद्योगांतून उत्पन्न म्हणून इतर उद्योगांचा २/३ महसूल मानले जाण्याची तरतूद केली आहे. उपरोल्लिखित नियमानुसार आरइन्फ्रा–टीने प्राप्तीकर वजा केल्यावर निव्वळ रकमेच्या २/३ महसुलाचा म्हणजे ०.०५ कोटी रूपयांचा विचार आर्थिक वर्ष १६–१७ साठी इतर उद्योगांतून आलेले उत्पन्न म्हणून केला असून त्यानंतर आर्थिक वर्ष १७–१८ पासून ०.०६ कोटी रूपये (करारानुसार ०१–०४–२०१७ पासून भाडे २५ टक्क्यांनी वाढणार आहे) केला आहे.

### ४.७ आर्थिक वर्ष १४–१५ साठी महसुली तफावतीवर/अतिरिक्तवर पुढे नेण्याचा खर्च

नमूद करण्यात येत आहे की, आर्थिक वर्ष १४–१५ साठी महसुली तफावत/अतिरिक्त माननीय आयोगाने एमटीआर आदेशात नमूद केल्याप्रमाणे आरइन्फ्रा–टीकडून आर्थिक वर्ष १५–१६ साठी अंदाजित एआरआरमध्ये विचाराधीन घेतली आहे. माननीय आयोगाने मान्यता दिलेली तफावत आणि आर्थिक वर्ष १४–१५ साठी अचूक समायोजनातील तफावतीतील फरकाचा परिणाम म्हणून वाढीव तफावत/(अतिरिक्त) आरइन्फ्रा–टीने सादर केल्याप्रमाणे आता आर्थिक वर्ष १६–१७ साठीच्या एआरआरमध्ये, संबंधित पुढे नेण्याच्या खर्चासह मिळवण्यात आली आहे, ज्यासाठीचा व्याजदर खाली दिल्याप्रमाणे आहेः

- आर्थिक वर्ष १४–१५ आणि आर्थिक वर्ष १५–१६ साठी व्याजदर माननीय आयोगाने खटला क्रमांक २२१/ २०१४च्या खेळत्या भांडवलासंबंधीच्या एमटीआर आदेशात मान्य केल्याप्रमाणे आहे.

- आर्थिक वर्ष १६–१७ साठी सदर याचिका सादर करण्याच्या वेळी एसबीआयचा पायाभूत दर ९.३ टक्के आहे ज्यात १५० पायाभूत गुण (१.५ टक्के) मिळवण्यात आले आहेत. त्यामुळे पुढे नेण्याच्या खर्चाच्या निश्चितीसाठी १०.८ टक्के दर गृहित धरण्यात आला आहे.

### ४.८ एकूण महसुली आवश्यकता

उपरोल्लिखित वैयक्तिक घटकांवर आधारित नियंत्रण कालावधी आर्थिक वर्ष १६–१७ ते आर्थिक वर्ष १९–२० साठीच्या प्रत्येक वर्षासाठी एकूण अंदाजित एकंदर महसुली आवश्यकता (एआरआर) खालील तक्त्यात दाखवल्याप्रमाणे आहे.

**तक्ता १०: नियंत्रण कालावधीसाठी एआरआर**

| अनु क्र | तपशील (रूपये कोटी) | आर्थिक वर्ष १६–१७ | आर्थिक वर्ष १७–१८ | आर्थिक वर्ष १८–१९ | आर्थिक वर्ष १९–२० |
|---|---|---|---|---|---|
| | **खर्च** | | | | |
| १ | संचालन आणि देखभाल खर्च | ५६.५२ | ६१.०५ | ६८.७० | ७९.४१ |
| २ | दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज | ६६.३८ | ८१.२२ | १२४.१८ | १७५.२६ |
| ३ | घसारा | ६६.३० | ८०.८५ | १११.१४ | १४८.७० |
| ४ | समभागांवर परतावा | ७८.१२ | ९१.४७ | १२२.५२ | १६०.६६ |
| ५ | खेळत्या भांडवलावर व्याज | ६.९५ | ७.०० | ९.१५ | १२.०८ |
| ६ | आपतकालीन साठ्यात योगदान | ३.७५ | ३.९६ | ५.१८ | ७.३० |
| ७ | प्राप्तीकर | २९.०९ | २९.०९ | २९.०९ | २९.०९ |
| **अ** | **एकूण खर्च** | **३०७.१०** | **३५४.६४** | **४६९.९६** | **६१२.४९** |
| | **इनएसटीएस वगळता महसूल** | | | | |
| ८ | बिगरदर उत्पन्न | २.९६ | ३.३४ | ३.७७ | ४.३४ |
| ९ | इतर उद्योगांतून उत्पन्न | ०.०५ | ०.०६ | ०.०६ | ०.०६ |
| **ब** | **एकूण महसूल** | **३.०१** | **३.४०** | **३.८३** | **४.४०** |
| **क** | **एआरआर (अ – ब)** | **३०४.०८** | **३५१.२४** | **४६६.१२** | **६०८.०९** |
| ड | आर्थिक वर्ष १४–१५ साठी महसुली तफावत /(अतिरिक्त) | ३२.८४ | | | |
| इ | आर्थिक वर्ष १४–१५ साठी महसुली तफावतीवर पुढे नेण्याचा खर्च/(अतिरिक्त) | –६.३६ | | | |
| फ | आर्थिक वर्ष १५–१६ साठी तात्पुरती महसुली तफावत/(अतिरिक्त) | २६.५२ | | | |
| **ग** | **निव्वळ एआरआर (क +ड + इ+फ)** | **३५७.०७** | **३५१.२४** | **४६६.१२** | **६०८.०९** |

आरइन्फ्रा–टी माननीय आयोगाला उपरोल्लिखित एआरआर नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी पारेषणातून वसूल करण्यासाठी मान्यता देण्याची विनंती करत आहे.